12-02-2025-Dai-04FF_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/11/2025 11:08 PM Page 1



## निवडक

### कवळेत सूरताल मैफल रंगतदार

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ११ :** कवळे –फोंडा येथील शांतादुर्गा संस्थानात यंदा वार्षिक जत्रोत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते.त्यात हार्मनी प्रस्तुत सूरताल सुगम संगीत मैफल अधिकच रंगतदार ठरली. भाव, भक्तीगीतांच्या या मैफलीत प्रसिद्ध गायक राजेश मडगांवकर व गायिका अन्नपूर्णा साखरदांडे यांनी यावेळी विविध गीते सादर करून रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळविली. 'जय जय जननी देवी 'या आर्त देवीच्या भक्तीगीते गायक राजेश यांनी मैफलीला आरंभ केला.त्याला जोडून ' देवाचिये द्वारी ' ही ज्ञानेश्वरांची प्रचलित अभंग रचना त्यांची खुपच तल्लीन करणारी ठरली. ब्रह्मा विष्णू आणि महेश्वर...! 'येग गेग विठाबाई ' ही अन्नपूर्णा साखरदांडे हिने सादर केली.' गुरु परमात्मा', 'वो काला एक बासुरीवाला 'ऐसी लागी लगन (भजन) राजेश मडगांवकर यांनी अगदी तयारीत गाऊन वातावरण भक्तिरसात न्हाऊन न्हेले.त्याच वातावरणात अन्नपूर्णा हिने ' प्रभू तेरो नाम ' 'पायोजी मैने ' 'राम आये है'आणि कोंकणी शांताई देवीचे गीत खुपच छान सादर केले.पुन्हा शेवटच्या भागात मडगांवकर यांनी 'येई हो विठ्ठले ' 'शोधिसी मानवा' ' निळ रंगान रंगले' (कोंकणी) गीत व शेवटी देवीचे गोंधळ गीत 'आई भवानी तुझ्या कृपेने तारीसी भक्ताला ' या गीताने सांगता केली. कार्यक्रमाचे सूत्रनिवेदन प्रदीप पंडित यांनी केले. वाद्यवृंद साथसंगतीत निहाल पै काणे (कीबोर्ड) दत्तराज सुर्लकर (हार्मोनियम) विशाल फातर्पेकर (तबला / ढोलक/ ढोलकी/ हॅन्डसोनिक) डॉ.मिलिंद साखरदांडे (ऑक्टोपॅड) प्रदीप पंडित (निवेदक) व शांता साऊंड फोंडा यांनी अप्रतिम ध्वनीसंकल्पनेची यावेळी जबाबदारी सांभाळली.

---

### कोरगावात बाल चक्री कीर्तने

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ११ :** श्री देव गोळोबा मंदीर नूतन मूर्ती प्रतिष्ठापना उत्सवानिमित्त कोनाडी कोरगाव पेडणे येथे विविध कार्यक्रमाबरोबर – गोव्यातील युवा कीर्तनकाराला चक्री कीर्तन कार्यक्रम झाला. यात हभप नेहा उपाध्ये, शिवानी वझे, मनुस्वी नाईक, शारदा आरोंदकर यानी बहारदार कीर्तने केले. प्रसिद्ध कीर्तनकार त्याना नबेला बबन आरोदेकर पेटी सुहास वझे ,विनोद नाईक आदींनी साथ संगीत केली. देवस्थान अध्यक्ष विश्वास नाराजी यांनी आभार मानले.

---

### कासरपाल येथील अध्यक्षपदी दीपक शिरोडकर

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ११ :** कासारपाल येथील दैवज्ञ ब्राह्मण समाजाचे आराध्य दैवत देवी महामाया कालिका संस्थान देवस्थानच्या नूतन कार्यकारिणीची निवड झाली. पुढील तीन वर्षासाठी निवडलेल्या या समितीत अध्यक्ष पदावर दिपक कमलकांत शिरोडकर यांची निवड करण्यात आली. नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : दीपक शिरोडकर अध्यक्ष, विनायक नागवेकर उपाध्यक्ष, पिनाक चोडणकर सचिव, सोमनाथ रायकर उपसचिव, अमर ओटवणेकर मुखत्यार, रितेश वेर्णेकर उपमुखत्यार, सुदेश नागवेकर खजिनदार आणि विवेकानंद नागवेकर उपखजिनदार.

# टीम इंडिया व्हाईटवॉश देण्यासाठी सज्ज

## इंग्लंडविरुद्ध आज तिसरी वनडे रोहितच्या खेळीकडे सर्वांचे असणार लक्ष

**अहमदाबाद, दि. ११ :** भारतीय राष्ट्रीय क्रिकेट संघ आणि इंग्लंड राष्ट्रीय क्रिकेट संघ यांच्यातील तिसरा एकदिवसीय सामना उद्या बुधवारी १२ फेब्रुवारी रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला जाणार आहे. तीन सामन्यांच्या मालिकेत टीम इंडिया २–० ने आघाडीवर आहे. त्यामुळे उद्याचा सामना जिंकून इंग्लंडला व्हाईटवॉश देण्याचा टीम इंडियाचा प्रयत्न असेल. तर दुसरीकडे, क्लीन स्वीप टाळण्याच्या इराद्याने इंग्लंडला संघ मैदानात उतरणार आहे.

दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताने इंग्लंडचा ४ विकेट्सने पराभव केला. या सामन्यात भारतीय कर्णधार रोहित शर्माने तुफानी शतकी खेळी केली. रोहित शर्माने ९० चेंडूत ११९ धावांची शतकी खेळी केली आणि त्याच्या कारकिर्दीतील ३२ वे



शतकही झळकावले. यादरम्यान त्याने १२ चौकार आणि ७ षटकार मारले. दरम्यान, रोहित शर्माने अनेक विक्रम आपल्या नावावर केले आहेत. त्यामुळे रोहित शर्माकडून संघाला उद्याच्या सामन्यात मोठ्या अपेक्षा असतील. रोहित व्यतिरिक्त शुबमन गिल, यशस्वी जयस्वाल, श्रेयस अय्यर, विराट कोहली यांच्याकडून मोठ्या खेळीची संघाला आशा असेल. जयस्वालला अजूनही साजेशी खेळी करता आलेली नाही. त्यामुळे संघात स्थान टिकवायचे असेल तर त्याला चांगली खेळी करावी लागेल.

दुसरीकडे, फिलिप सॉल्ट (विकेटकीपर), बेन डकेट, जो रूट, हॅरी ब्रूक, जोस बटलर हे इंग्लंडचे फलंदाज मोठ्या खेळीच्या इराद्याने मैदानात उतरतील. त्यांचा कोणत्याही परिस्थितीत व्हाईटवॉश टाळण्याचा प्रयत्न असेल. गेल्या सामन्यात सॉल्ट, डकेट, बटलरने चांगली खेळी केली होती.

**संभाव्य प्रतिस्पर्धी संघ :**

**भारत :** रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल (उपकर्णधार), यशस्वी जयस्वाल, श्रेयस अय्यर, विराट कोहली, अक्षर पटेल, केएल राहुल (विकेटकीपर), हार्दिक पंड्या, रवींद्र जडेजा, हर्षित राणा, कुलदीप यादव, मोहम्मद शमी, वरुण चक्रवर्ती, वॉशिंग्टन सुंदर आणि अर्शदीप सिंह.

**इंग्लंड :** फिलिप सॉल्ट (विकेटकीपर), बेन डकेट, जो रूट, हॅरी ब्रूक, जोस बटलर (कर्णधार), जेकब बेथेल, लियाम लिव्हिंगस्टोन, ब्रायडन कार्स, आदिल रशीद, जोफ्रा आर्चर, साकिब महमूद, गुस ऍटकिन्सन, मार्क वुड, जेमी ओव्हरटन आणि जेमी स्मिथ.

### रोहितला विक्रमासाठी १३ धावांची गरज

रोहित शर्माने २६७ एकदिवसीय सामन्यांमध्ये १०९८७ धावा केल्या आहेत. रोहित शर्मा ११००० धावा पूर्ण करण्यापासून फक्त १३ धावा दूर आहे. मात्र, तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात रोहित शर्माला त्याच्या ११००० धावा पूर्ण करण्याची सुवर्णसंधी आहे. यादरम्यान, रोहित मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा २३ वर्ष जुना विक्रम मोडू शकतो. एकदिवसीय सामन्यात सर्वात जलद ११ हजार धावा करण्याच्या बाबतीत विराट कोहली अव्वल स्थानावर आहे. २०१९ मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या २३० व्या सामन्यात विराटने ही कामगिरी केली होती, दुसऱ्या क्रमांकावर सचिन तेंडुलकर आहे, ज्याने २००२ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या २८४ व्या सामन्यात ११००० एकदिवसीय धावा पूर्ण केल्या होत्या. आता रोहितकडे त्याचा २६८ वा एकदिवसीय सामना खेळताना ११००० एकदिवसीय धावा पूर्ण करण्याची मोठी संधी आहे.

### आतापर्यंतचा रेकॉर्ड कसा आहे ?


अहमदाबादचे सरदार पटेल स्टेडियम त्याच्या नूतनीकरणानंतर नरेंद्र मोदी स्टेडियम बनलं आहे. टीम इंडियाने या स्टेडियममध्ये एकूण २० सामने खेळले आहेत. त्यापैकी ११ सामने जिंकले आहेत आणि ९ सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. दोन्ही संघात आतापर्यंत एकूण १०८ वनडे सामने खेळले गेले आहेत. भारतीय संघाने ५९ सामने जिंकले आहेत, तर इंग्लंड संघाने ४४ सामने जिंकले आहेत. याशिवाय ३ सामने अनिर्णीत राहिले आणि २ सामने बरोबरीत सुटले.

# रॉयल किंग्ज गुळेलीला विजेतेपद

## गुळेली चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धा : बीएससी माळोली उपविजेते

■ टीम दैनिक हेराल्ड

**गुळेली, दि. ११ :** शांतादुर्गा युवा संस्था गुळेली सत्तरीतर्फे वाळपई व पर्ये मतदारसंघ मर्यादित गुळेली प्रिमियम लिग आयोजित केली होती. त्यात रॉयल किंग्ज गुळेली विजेते तर बीएससी माळोली यांनी उपविजेतेपद पटकावले. तिसरे स्थान – वाघेरी टायगर्स, चौथे स्थान – एमएम स्टार्स या स्पर्धेत व्ही २ वॉरियर्स, सातेरी बॉईज,व्हीएससीसी, टीम फॉक्सेस, वेदार्थ स्ट्रायकर्स, रुद्र स्ट्रायकर्स या संघांनी सहभाग घेतला होता.




वैयक्तिक पुरस्कार विजेते अंतिम सामन्याचा सामनावीर – रक्षक गावकर (रॉयल किंग्ज), सर्वोत्तम फलंदाज – सुनील गावकर (बीएससी माळोली) , सर्वोत्तम गोलंदाज – प्रकाश देसाई (रॉयल किंग्ज) , सर्वोत्तम यष्टीरक्षक शंकर गावकर (वाघेरी टायगर्स) , स्पर्धावीर संकल्प पेडणेकर (रॉयल किंग्ज) यांना मिळाले.

आरोग्यमंत्री विश्वजित राणे आणि आमदार देविया राणे यांचा मोठा पाठिंबा या स्पर्धेसाठी लाभला. बक्षिस वितरण कार्यक्रमाला गुळेली सरपंच नितेश गावडे, पंच अक्षिता गावडे, पंच संतोषी नाईक, पंच सिद्धू गावकर, माजी सरपंच व उद्योजक विशांत नाबर, आत्माराम देसाई आणि शेखर गावडे तसेच रॉयल किंग मालक नीलेश गावडे गुळेली, उपविजेता बीएससी माळोली नगरगाव मालक प्रशांत गावकर, सेमी लूझर टीम वाघेरी वाघ मालक दीपाजी राणे अडवई , एम एम स्टार मालक मिलिंद म्हाळशेकर खोतोडे उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. सूत्रसंचलन बाबुराव देसाई, स्वागत अनिल गावडे, आभार सुनील नाईक यांनी मानले.

# आंबिये महाविद्यालयात हस्तलिखित संवर्धन परिचयवर कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**अभिलेखागार विभाग आणि इतिहास विभागातर्फे आयोजन**

**पर्वरी, दि. ११ :** गोवा सरकारचा अभिलेखागार विभाग आणि संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालयातील इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हस्तलिखित संवर्धन परिचय या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यशाळेत अभिलेखागार विभागातील उपसंचालक ब्लॉसम मेडेरा, डॉ. बालाजी शेणवी यांच्या मार्गदर्शनाखाली गायत्री घाटवळ, गिरीश मावलणकर, साईली भोसले आणि संध्या भांडणकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इतिहास विभागातील डॉ.झेवियर मार्टिन्स, डॉ.रोहित फळगावकर, प्रा. साईराज भट यांनी या कार्यशाळेचे संयोजन केले. गोव्यातील अभिलेखागार विभाग हा अशियातील सर्वांत जुना अभिलेखागार विभाग असून यामध्ये कागदी हस्तलिखितांचा मोठा संग्रह आहे. या हस्तलिखितांच्या पडताळणीसाठी विशेष कौशल्य आणि तंत्राची आवश्यकता असते. या हस्तलिखितांचे जतन करण्यासाठी महाविद्यालयातील तरुणांना हस्तलिखित तंत्राचे ज्ञान देऊन त्यांना प्रगल्भ करणे हा हेतूने अभिलेखागार विभाग व आंबिये महाविद्यालयातील इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात केलेले होते.

> **अभिलेखागार विभाग व आंबिये महाविद्यालयातील इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना अभिलेखागार आणि संबंधित विषयांमध्ये पदव्युत्तर शिक्षणासंदर्भात दिशा मिळेल आणि या क्षेत्रातील करियरच्या अनुषंगाने वेगळे पर्याय मिळतील.**
> **–डॉ. रोहित फळगावकर,** सहायक अधिव्याख्याता, इतिहास विभाग, आंबिये सरकारी महाविद्यालय.

### प्रदर्शन, व्याख्याने आणि प्रात्यक्षिकावर भर

या कार्यशाळेच्या अनुषंगाने ग्रंथालयातील पुस्तके आणि मोडी मराठी नोंदींच्या प्रदर्शनाचे आयोजन केलेले होते. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी हस्तलिखित संवधर्नाचे महत्त्व, अभिलेखागारात आढळणाऱ्या कागदाचे प्रकार, वापरली जाणारी शाई इत्यादींचा आढावा घेतला. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी अभिलेखागार विभागाला भेट दिली. तेथे त्यांनी दुरुस्ती, हाताळणी, स्वच्छता संतुलित संवर्धन प्रवेश यांसारख्या संवर्धन तंत्रांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.



वेरे : १४ वर्षाखालील खो–खो विजेत्या बांदोडकर मेमोरियल हायस्कूल संघासोबत मुख्याध्यापक दीपक नाईक, सतीश नाईक व निखिल रायकर.

# वेरे दयानंद बांदोडकर हायस्कूल संघास खो– खोचे जेतेपद

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ११ :** गोवा क्रीडा व युवा व्यवहार संचालनालय आयोजित १४ वर्षांखालील शालेय खो–खो स्पर्धेत दयानंद बांदोडकर मेमोरियल हायस्कूल संघास जेतेपद प्राप्त झाले. सदर स्पर्धा कीटला हळदोणा क्रीडा संकुलात झाली. अंतिम सामन्यात डिचोली नवदुर्गा हायस्कूल संघाचा पराभव केला. या सामन्यात कृष्णा ठाकूर कर्णधार,जितेश हिरामणी, मयूर गुडेकर, ऋषिकेश गावस, मोहिन सुतार, सादिक अन्सारी, प्रशांत भारती, सुबिर दास, अनिकेत कुमार, अलिस्टन गोम्स, सुमित कुमार, संस्कार आरोस्कर यांचा समावेश होता. हायस्कूलचे मुख्याध्यापक दीपक नाईक, क्रीडा प्रशिक्षक सतीश नाईक व शिक्षक निखिल रायकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# केरीत 'सर्पदंश : उपचार आणि सुरक्षा'वर जागृती

**साखळी सरकारी महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघटनेचा पुढाकार**

■ टीम दैनिक हेराल्ड

**केरी, दि, ११ :** कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, साखळी येथील माजी विद्यार्थी संघटना, जैवविविधता देखरेख समिती केरी–सत्तरी आणि विवेकानंद ज्ञानमंदिर हायस्कूल केरी यांच्या संयुक्त विद्यमाने विवेकानंद ज्ञानमंदिर हायस्कूल केरी येथे विद्यार्थ्यांसाठी संर्पदंश : उपचार आणि सुरक्षा या विषयावर जागृती सत्राचे आयोजन



दि.७ब्रुवारी रोजी करण्यात आले. साखळी सरकारी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी आणि जैवविविधता देखरेख समिती केरी–सत्तरीच्या अध्यक्ष नंदा माजिक यांनी या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून भूमिका निभावली. या व्याख्यानाचा उद्देश सर्पदंशाबद्दल जागरुकता निर्माण करणे आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यू आणि अपंगत्वाची संख्या कमी करण्यासाठी उपाययोजना आखणे हा होता. प्राणीशास्त्राच्या सहायक प्राध्यापिका, संसाधन व्यक्ती डॉ. सुमन तारी यांनी आपल्या विवेचनात आपल्या सभोवताली असलेल्या सापांचे महत्त्व आणि त्यांची आवश्यकता विशद केली. याशिवाय विषारी आणि बिनविषारी प्रजाती, त्यांच्या लपण्याच्या जागा ज्या सहजपणे ओळखता येतात याचे सादरीकरणही डॉ.तारी यांनी केले. याशिवाय साप चावल्यास प्रथमोपचार कोणते करावेत आणि त्यानंतर कोणते उपचार करावेत याविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना डॉ. सुमन तारी यांनी दिली.

**९० विद्यार्थ्यांनी घेतला लाभ**

संर्पदंश : उपचार आणि सुरक्षा या विषयावरील डॉ. सुमन तारी यांच्या व्याख्यानाचा विवेकानंद ज्ञानमंदिर हायस्कूल केरी येथील ९० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

# सिंक रेंजर्स यूसीचा दुसरा विजय

## मडगाव स्ट्रायकर्सचा विजयी चौकार

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ११ :** गोवा जीएसबी स्पोर्ट्स अँड चॅरिटेबल ट्रस्ट यांनी गोवा सारस्वत समाज यांच्या सहकार्याने मडगावच्या एमसीसी मैदानावर आयोजित केलेल्या आल्कॉन जीएसबी युनिटी कप टी–२० क्रिकेट स्पर्धेत रविवारी सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्सने आपल्या विजयाची मालिका कायम राखताना अपराजित दौड कायम राखली. त्यांनी आपला सलग चौथा विजय मिळविला. त्यांनी रविवारी मडगाव रॉयल्सवर १८ धावांनी मात केली. मेगा स्ट्रायकर्सने निर्धारित २० षटकांत ८ बाद १४३ धावा केल्या.

या धावसंख्येचा यशस्वी बचाव करताना त्यांनी रॉयल्सला १९.२ षटकांत १२५ धावांत गुंडाळले. मेगा स्ट्रायकर्स हा या स्पर्धेत आत्तापर्यंत अपराजित असलेला एकमेव संघ आहे. २३ धावा व २३ धावांत २ गडी बाद केलेला सिद्धेश प्रभू अळवेणकर हा या कामगिरीसाठी




मडगाव : कपिल बोरकर यांच्याकडून मॅन ऑफ द मॅच पुरस्कार स्वीकारताना मेघ नेत्रावळकर व आतिश आंगले यांच्याकडून हिरो ऑफ द मॅच पुरस्कार स्वीकारताना साईराज धोंड.

मॅन ऑफ द मॅच ठरला.

दिवसातील दुसऱ्या सामन्यात सिंक रेंजर्स यूसीने रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुजचा ७ गडी व २५ चेंडू राखून सहज पराभव केला. अंत्रुजने २० षटकांत ७ बाद १४९ धावा केल्यानंतर सिंक रेंजर्सने केवळ १५,५ षटकांत ३ गडी गमावून १५३ धावा करत विशाल विजय प्राप्त केला. अंत्रुजला आत्तापर्यंत खेळलेल्या सर्व पाचही सामन्यांत पराभव झाला आहे. स्पर्धेत अजूनपर्यंत एकही विजय मिळविता न आलेला अंत्रुज हा एकमेव संघ राहिला आहे. फलंदाजीत ३७ धावा व गोलंदाजीत १ गडी बाद केलेल्या मेघ नेत्रावळकर याला मॅन ऑफ द मॅच पुरस्कार लाभला.

**संक्षिप्त धावफलक**

सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्स – २० षटकांत ८ बाद १४३ (आदित्य आंगले ३६, सिद्धित रायतुरकर २५, सिद्धेश प्रभू अळवेणकर २३, ग्रांथिक बुयांव २३–२, संप्रभ फळदेसाई ३३–२, सिद्धेश देसाई १२–१, कार्तिक हट्टंगडी १५–१) विजयी वि. मडगाव रॉयल्स – १९.२ षटकांत सर्वबाद १२५ (कौशल हट्टंगडी ३४, कार्तिक हट्टंगडी ३१, अर्श सरदेसाई २५, आदित्य प्रभुगावकर १९–२ ,यश प्रभुगावकर १६–२, सिद्धेश प्रभू अळवेणकर २३–२, अमोद बोरकर १५–१, अनिमेश प्रभुगावकर २१–१, आदित्य आंगले २९–१)

रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुज यूसी – २० षटकांत ७ बाद १४९ (ईशान कामत ४०, गौरीश शेणवी लोटलीकर २९, प्रतोश पिळगावकर २१, पार्थ कोसंबे १८, सनत म्हापणे २६–२, मेघ नेत्रावळकर २०–१, सनत कामत २२–१) पराभूत वि. सिंक रेंजर्स यूसी – १५.५ षटकांत ३ बाद १५३ (मेघ नेत्रावळकर ३७, साईराज धोंड ३५, साहील अडवलपालकर नाबाद ३४, वर्धन प्रभू मिस्किन नाबाद २७, अमोघ नमशीकर २०–१)



मांद्रे : १४ वर्षांखालील जिल्हास्तरीय स्पर्धेत उपविजेत्या संघासोबत क्रीडाशिक्षक विराज म्हामल आणि शाळेचे मुख्याध्यापक शरद गावडे.

# मांद्रे खलप हायस्कूलचा संघ व्हॉलीबॉल स्पर्धेचा उपविजेता

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ११ :** मांद्रे येथील रमाकांत द. खलप हायस्कूल संघाच्या विद्यार्थिनींनी किटला स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, हळदोणा येथे आयोजित जिल्हा स्तरावरील व्हॉलीबॉल स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींच्या गटात उपविजेतेपद पटकावले.

या स्पर्धेचे आयोजन गोव्याच्या क्रीडा आणि युवा व्यवहार संचालनालयाने केले होते. स्पर्धेत रमाकांत खलप हायस्कूल मांद्रेच्या विद्यार्थिनींनी त्यांच्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून उपविजेतेपद मिळवले. या विद्यार्थिनींना शाळेतील क्रीडाशिक्षक श्री. विराज म्हामल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण दिले गेले. त्यांच्या कष्ट आणि मेहनतीचा परिपाक म्हणून त्यांनी ही सफलता मिळवली.

शाळेचे मुख्याध्यापक शरद गावडे, संस्थेचे अध्यक्ष ॲड. रमाकांत खलप, व्यवस्थापन सदस्य आणि पालकांनी उपविजेतेपद मिळवलेल्या विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. त्यांच्या कष्टाचे व कौशल्याचे कौतुक करत शाळेच्या सर्व क्रीडाप्रेमींनी त्यांचे उत्कृष्ट कामगिरीचे स्वागत केले.

बैद्यनाथ नागपूर असली आयुर्वेद

पाईल्स (मुळव्याध) च्या त्रासापासुन त्रस्त?

सिड्पाईल्स टॅबलेट

मूळव्याध, बध्दकोष्ठता, फिस्टुला, गुदा मार्गातील सूज,दाह टोचल्या प्रमाणे वाटणे, खाज, असहनीय वेदना इ. त्रास दूर करणयास मदत करते.




अभयामृत

बऱ्याच काळापासून असलेल्या जीर्ण बध्दकोष्ठतेला दूर करुन पाचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करते.




UIN:MP 1724

स्वस्थ पाचन, स्वस्थ जीवन

वैद्यकीय सल्ला : +91 844 844 4935

www.baidyanath.co

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १६० **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 160 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .